दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
dainiklokaarambh@gmail.com
LOK AARAMBH संपादक:राहुल मारोतीराव वाईकर कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले
बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | गुरुवार २१ ऑगस्ट २०२५ | अंक २४३ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु


आजचा दिनविशेष
१९७२ : वन्यजीव संरक्षण कायदा, १९७२ भारतात मंजूर झाला


SUN Tourism — All Tours घर से घर तक — दिल से दिल तक — www.suntourismpune.in
सन टुरिझम
प्रस्तुत करते
देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्रुप टूर्स !
आमच्या विशेष टूर पॅकेजेस
काश्मीर, वैष्णोदेवी, नैनीताल, शिमला, अयोध्या ग्रँड युरोप, ऑस्ट्रेलिया, जपान, दुबई, श्रीलंका व्हिएतनाम, सिंगापूर, थायलंड, बाली
आता आपल्या स्वप्नांच्या सहलींची नोंदणी करा...
-: अधिक माहितीसाठी संपर्क :-
99222 22272 / 7602727555


# झोप उडवणारं बिल, :तर पंतप्रधानांनाही पद सोडावं लागणार; नव्या विधेयकातील नियम

## पदावरून कधी हटवले जाणार?

आज संसदेत सादर केलेल्या विधेयकांमध्ये अशी तरतूद आहे की, जर पंतप्रधान, मुख्यमंत्री किंवा मंत्री यांना किमान 5 वर्षे किंवा त्याहून अधिक कारावासाच्या शिक्षेच्या गुन्ह्यासाठी अटक करण्यात आली आणि ते सलग 30 दिवस कोठडीत राहिले तर त्यांना 31 व्या दिवशी पदावरून काढून टाकणे बंधनकारक असेल. अशा परिस्थितीत राष्ट्रपती पंतप्रधानांना पदावरून हटवतील. राज्यपाल मुख्यमंत्र्यांना पदावरून हटवतील. पंतप्रधान आणि मुख्यमंत्री मंत्र्यांना हटवतील. तसेच




केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी लोकसभेत पंतप्रधान-मुख्यमंत्री आणि मंत्र्यांना पदावरून काढून टाकण्यासाठी 3 विधेयके सादर केली. या विधेयकांमध्ये जर पंतप्रधान, मुख्यमंत्री किंवा कोणत्याही मंत्र्याला एखाद्या गुन्हेगारी प्रकरणात अटक झाली तर त्यांना पदावरून काढून टाकता येणार आहे. आज अमित शहा यांनी संविधान (130 वी दुरुस्ती) विधेयक 2025, केंद्रशासित प्रदेश सरकार (सुधारणा) विधेयक 2025, आणि जम्मू आणि काश्मीर पुनर्रचना (सुधारणा) विधेयक2025 लोकसभेत सादर केले. या विधेयकांबाबत सभागृहात मोठा गोंधळ झाला. या सर्व विधेयकांबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात. पंतप्रधानांनाही पदावरून हटवता येणार केंद्र सरकार संविधानात आता मोठा बदल करण्याच्या तयारीत आहे. आज सादर झालेल्या विधेयकांमध्ये गंभीर गुन्हेगारी प्रकरणांमध्ये 30 दिवसांपेक्षा जास्त काळासाठी अटक झाल्यास पंतप्रधान, केंद्रीय मंत्री, मुख्यमंत्री आणि राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मंत्र्यांना त्यांच्या पदावरून काढून टाकण्याची शिफारस करण्यात आली आहे. पुन्हा पदावर नियुक्ती होऊ शकते वरील विधेयकांमध्ये असेही नमूद करण्यात आले आहे की, जर मंत्री किंवा मुख्यमंत्री कोठडीतून बाहेर आले तर त्यांना पुन्हा त्या पदावर नियुक्त करता येईल. गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटले की, एखाद्या मंत्र्यांला ताब्यात घेतल्यास त्याला पदावरून काढून टाकण्याची सध्याच्या संविधानात कोणतीही तरतूद नाही. त्यामुळे आता संविधानाच्या अनुच्छेद 75, 164 आणि 239 AA मध्ये सुधारणा करण्यात येत आहे.

अनुच्छेद 75 हे पंतप्रधान आणि केंद्रीय मंत्र्यांशी संबंधित आहे. अनुच्छेद 164 हे मुख्यमंत्री आणि राज्यातील मंत्र्यांशी संबंधित आहे. तर अनुच्छेद 239 AA दिल्लीचे मुख्यमंत्री आणि मंत्र्यांशी संबंधित आहेत. या विधेयकांचे कायद्यात रुपांतर झाल्यास ती संपूर्ण देशभरात लागू होणार आहे.

# दुधाला भाव द्या म्हणत खा.सोनवणे झाले आक्रमक
## संसदेसमोर आंदोलन, दूध अनुदान पुन्हा सुरू करण्याचीही मागणी

बीड: महाराष्ट्र राज्यातील दूध उत्पादक शेतकरी त्यांच्या विविध मागण्या मान्य करण्यासाठी वेगवेगळ्या स्तरावर सतत आंदोलन करीत आहेत, परंतु त्यांच्या मागण्यांकडे गांभिर्याने पाहिले जात नाही. यामुळे खा.बजरंग सोनवणे यांनी अनेक खासदारांना एकत्रित करत दि.१९ रोजी संसदेसमोरच आंदोलन केले. राज्यात शेतकरी आणि दुध उत्पादक अडचणीत आहेत. दुधाला मिळणारा भाव आणि जनावरांवर होणारा खर्च याचा ताळमेळ बसायला तयार नाही. यामुळे दुध उत्पादकांना दुधाचा दर वाढून मिळावा, यासाठी बीडचे खा.बजरंग सोनवणे यांनी सहकारी



खासदारांना एकत्रित करून दिल्ली येथे संसदभवन समोर आंदोलन केले. यावेळी गायी व म्हशीच्या दुधाला दर वाढऊन द्यावा, बंद केलेले दूध अनुदान पुन्हा सुरु करावा, दीर्घकालीन 'दूध धोरण' रचना करावी, अशी मागणी करण्यात आली. राज्यात विविध भागात दुध उत्पादकांचे आंदोलन सुरू आहे. त्यांच्या आंदोलनात सर्वसामान्य शेतकरी देखील सहभागी होत असून दि.१९ रोजी दुध उत्पादकांच्या आंदोलनाच्या समर्थनामधे संसदेच्या दारावर प्रतिकात्मक आंदोलन करण्यात आले. यावेळी दूध उत्पादक शेतकऱ्यासमोरील आव्हाने कमी करणे व दुधाला दर मिळऊन देण्यासाठी प्रयत्नशील राहू, असे खा.बरजंग सोनवणे यांनी म्हटले. यावेळी खा.छत्रपती शाहू महाराज, खा.निलेश लंके आणि इतर खासदारांची उपस्थिती होती. खा.बजरंग सोनवणे हे शेती आणि शेतकऱ्यांच्या जोडव्यवसायावर लक्ष ठेवून आहेत. दुध उत्पादक अडचणीत सापडले म्हणून त्यांनी आंदोलनाचा निर्णय घेतला होता.. दूध हे शेतकऱ्यांसाठी केवळ उत्पादन नसून जोडधंदा आणि जीवन जगण्याचा अविभाज्य घटक आहे. मात्र, आज दुधाला योग्य भाव मिळत नाही, उत्पादन खर्चापेक्षा कमी दराने विक्री करावी लागत आहे. दुसरीकडे दुधात भेसळ करणारे लोक सर्वसामान्य जनतेच्या आरोग्याशी खेळ करत आहेत. या शेतकरी आणि ग्राहकांशी निगडित प्रश्नांवर इंडिया आघाडीच्या खासदारांनी मंगळवारी (दि.१९) संसद भवनासमोर आंदोलन करत सरकारचे लक्ष वेधले.

# शिरसाट यांच्याकडून 5000 कोटींचा भ्रष्टाचार?

सामाजिक न्यायविभागाचे मंत्री संजय शिरसाट यांच्याविरोधात आमदार रोहित पवार यांनी भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप केले आहेत. शिरसाट यांनी 5000 कोटी रुपयांच्या जमीन घोटाळा केला आहे, असं रोहित पवारांनी म्हटलंय. याचा आरोपांना घेऊन रोहित पवार यांनी नवी मुंबईच्या सिडको भवनावर मोर्चा केला. भिवलकर कुटुंब स्थानिक नसतानाही शिरसाट यांनी त्यांना जमीन कशी दिली? असा सवालही रोहित पवार यांनी उपस्थित केलाय. दरम्यान, रोहित पवार यांनी केलेल्या या गंभीर आरोपांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. असे आरोप रोजच होत असतात, पुरावे द्या, असं फडणवीसांनी म्हटलंय. फडणवीस यांच्याकडून शिरसाट यांची पाठराखण सिडकोचं अध्यक्षपद मिळाल्यानंतर संजय शिरसाट यांनी भिवलकर कुटुंबीयांना हजारो कोटींची जमीन दिली, असा आरोप रोहित पवारांनी केलाय. त्यावर बोलताना रोहित पवार यांच्यासारखी मंडळी रोजच असे आरोप करत असतात. पण पुरावे दिले पाहिजेत. पुरावे नसताना असे आरोप करणे योग्य नाही. ही केस अजून मी पाहिलेली नाही. मात्र पुराव्यानिशी आरोप केले तर त्या आरोपांना तेवढेच परिणामकारक उत्तर दिले जाते.

# डॉ. गणेश डोळे सरांचा वाढदिवस केला सामान्य रुग्णांनी साजरा.

बीड (प्रतिनिधी)*वेलनेस मल्टी स्पेशलिटी हॉस्पिटलचे अस्थिरोग तज्ञ डॉक्टर गणेश डोळे सर यांनी खूप कमी दिवसात भरपूर मेहनत केली*मितभाषा, सुसंस्कृत, स्मित हास्य, कमी बोलने, उच्च शिक्षण परफेक्ट ट्रीटमेंट, महात्मा फुले योजनेत बसून मोफत उपचार प्रसंगी कमीत कमी खर्चात चांगल्यात चांगले उपचार या सप्तसूत्रीच्या जोरावर फार कमी दिवसात बीड जिल्ह्यातील जनतेच्या मनात घर केले *वेलनेस मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचे अस्थिरोग तज्ञ.डॉ.गणेश डोळे सर, यांचा आज जन्मदिवस.. त्यांच्या वाढदिवसानिमित्त सकाळपासूनच जिल्ह्यातील वेगवेगळ्या भागातून त्यांच्या हातून बरे झालेले रुग्णांनी त्यांना शुभेच्छा देण्यासाठी गर्दी केली होती. प्रत्येकाने आपण कसे आजारी होतो आपल्याला किती त्रास होता. आपण किती ठिकाणी फिरलो आणि शेवटी औरंगाबाद, पुणे ला जाऊनही फायदा झाला नाही. पण, बीड येथील शिवराज पण सेंटरच्या समोर असलेल्या वेलनेस मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचे हाडाचे डॉ.गणेश डोळे सर यांचे मुळेच आपण बरे झालो असे बोलून डॉक्टर साहेबांचे गोडवे गात होते. डॉक्टर साहेबांनी आम्हाला आमच्याकडे पैसे नसतानाही आम्हाला योजनेत बसून सर्व काही मोफत करून दिले असे बोलत होते. यावेळी दिवसभर बाहेरून आलेल्या लोकांनी डॉक्टरांना भरभरून शुभेच्छा व आशीर्वाद दिले.आई जगदंबा आपणास निरोगी व उदंड आयुष्य देवो आपल्या हातून अशीच ईश्वरसेवेसमान जनसेवा घडत राहो अशी सर्वांनीच जगदंबे चरणी प्रार्थना केली




# बीडमध्ये दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन-डॉ.योगेश क्षीरसागर

बीड। प्रतिनिधी भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंती वर्षानिमित्त ङ्गजनजाती गौरवफ विशेष कार्यक्रमांतर्गत बीडमध्ये दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. ङ्गभारतीय इतिहासाच्या जडणघडणीत जनजाती (आदिवासी) समाजाचे योगदान व भूमिकाफ या विषयावर आधारित हे चर्चासत्र २४ व २५ ऑगस्ट २०२५ रोजी पार पडणार असल्याची माहिती संयोजन समितीचे मार्गदर्शक तथा नवगण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिली. बीडमध्ये सौ.के.एस.के. महाविद्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत बुधवारी (दि.२०) ते बोलत होते. यावेळी संयोजन समितीचे सल्लागार डॉ.सुधाकर गुट्टे, परिषद संयोजक प्रा.हमराज उईके यांची उपस्थिती होती. या शैक्षणिक उपक्रमाचे आयोजन नवगण शिक्षण संस्था संचलित पाटोदा येथील वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाने केले असून भारतीय सामाजिक विज्ञान संशोधन परिषद, नवी दिल्ली आणि आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे या संस्थांचे सहकार्य लाभले आहे.

# हजयात्रा नोंदणी पहिला हप्ता भरण्यासाठी मुदतवाढ द्या: खा.सोनवणे

बीड/प्रतिनिधी: पवित्र हज यात्रा-२०२६ नोंदणी संदर्भातील पहिला हप्ता भरण्याची अंतिम तारीख दि.३०ऑगस्ट पर्यंत वाढवावी, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय अल्पसंख्यक मामले विभागाचे मंत्री किरेन रिजिजू यांची भेट घेऊन केली. पत्रात म्हटले आहे, पवित्र हज यात्रेला महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात मुस्लिम बांधव जात असतात. नोंदणीसंदर्भातील पहिला हप्ता भरण्यासाठी दि.२० ऑगस्टपर्यंतच मुदत देण्यात आलेली आहे. परंतु लॉटरी जाहीर झाल्यानंतर १५ ते १७ ऑगस्टपर्यंत बँकांच्या सलग सुट्ट्या आणि बँकांमधील तांत्रिक अडचणींमुळे हज साठी इच्छुक अनेक यात्रेकरुंना वेळेत रक्कम जमा करता आली नाही. हज यात्रेसाठी जाणाऱ्या नागरिकांची अडचण लक्षात घेणे आवश्यक असून त्यांना हजला जायचे असताना नोंदणी प्रक्रियेत अडचणी निर्माण होवू नयेत, यासाठी दि.३० ऑगस्टपर्यंत मुदतवाढ देणे आवश्यक आहे. या विषयाकडे गांभिर्याने पाहून मुदतवाढ द्यावी, अशी मागणीही खा.बजरंग सोनवणे यांनी केली आहे. यावेळी केंद्रीय अल्पसंख्यक मामले विभागाचे मंत्री किरेन रिजिजू यांनी खा.बजरंग सोनवणे यांना या विषयावर वैयक्तिक लक्ष घालून आवश्यक निर्णय घेण्याचे आश्वासन दिले आहे. खा.बजरंग सोनवणे सातत्याने सामाजिक विषय मांडत असल्याने त्यांच्या पाठपुराव्याचे आणि विषय मांडणीचे कौतूक होत आहे.



# सोयाबीन पाण्याखाली शेतकरी आर्थिक संकटात

**पंचनामे करून नुकसानभरपाईची लिंबागणेश येथील शेतकऱ्यांची मागणी – डॉ.गणेश ढवळे**

लिंबागणेश : (दि.१९)गेल्या ३-४ दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे बीड तालुक्यातील लिंबागणेश पंचक्रोशीतील फुलोऱ्यापासून शेंगा लागण्याच्या अवस्थेत असलेले सोयाबीन, मुग, उडीद आदी पिके पाण्याखाली गेली आहेत. अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे पिक वाया जाण्याची भीती आहे. शासनाने तातडीने पंचनामे करून नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी शेतकरी रामकिसन गिरे, रामचंद्र मुळे, रामदास मुळे, अभिजित गायकवाड, जितेंद्र निर्मळ, बाबु आण्णा वायभट, राजेभाऊ गिरे, श्रीहरी निर्मळ, चिंतामण गिरे, अक्षय वायभट आदींनी केली आहे.

"सोयाबीनला बुरशी लागली; पिक वाया" – रामकिसन गिरे सलग पावसामुळे सोयाबीनमध्ये पाणी साचल्याने मुळांना बुरशी लागली आहे. मुळांना गाठी येऊन वाढ खुंटली असून पिक वाया गेले आहे. शासनाने तातडीने पंचनामे करून नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी शेतकरी रामकिसन गिरे यांनी केली. दरम्यान, रामचंद्र मुळे यांनी मागील २-३ वर्षांपासून शासन पंचनामे करूनही शेतकऱ्यांना नुकसानभरपाई न मिळाल्याचे सांगितले.

ओला दुष्काळ जाहीर करून सरसकट नुकसानभरपाई द्यावी" – डॉ.गणेश ढवळे बीड जिल्ह्यातील बहुतांश गावांमध्ये अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे पिक पूर्णपणे वाया गेले आहे. शासनाने पंचनाम्याचे आदेश दिले तरी ते प्रत्यक्षात होत नसल्याचे दिसून येते. शेतकरी आर्थिक संकटात सापडले असल्याने शासनाने ओला दुष्काळ जाहीर करून सरसकट नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे

# 'मल्टिस्टेट' घोटाळ्यात शहांची एन्ट्री; लिक्विडेटरमार्फत मिळणार पैसे, ठेवीदारांना दिलासा

**खा.बजरंग सोनवणे यांनी जिजाऊ, ज्ञानराधा, शुभकल्याण, राजस्थानी पतसंस्थांबाबत मांडला होता संसदेत प्रश्न**

बीड: बीड जिल्ह्यासह राज्यातील विविध भागात शाखा असलेल्या ज्ञानराधा, जिजाऊ, शुभ कल्याण, जिजामाता व राजस्थानी मल्टीस्टेट पंतसंस्था चालकांनी ठेवीदारांना कोट्यावधींचा चुना लावलेला आहे. ठेवीदारांना त्यांचे पैसे परत मिळावेत, यासाठी खा.बजरंग सोनवणे यांनी संसदेत व संसदे बाहेर सतत पाठपुरावा केलेला आहे. खा.सोनवणे यांनी संसदेच्या अधिवेशनात प्रश्न उपस्थित केला होता. त्यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे व प्रभावी मांजणीमुळे या प्रकरणी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी लक्ष घातले असून आता ठेवीदारांना लिक्विडेटरमार्फत ठेवी परत मिळतील, असे लेखी उत्तरही दिले आहे. बहु-राज्य सहकारी पतसंस्थांनी ठेवीदारांचे पैसे न परतवल्याबाबत लोकसभा प्रश्नोत्तरात केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी महत्त्वाची माहिती दिली. बीडचे खा.बजरंग सोनवणे यांनी अशा सर्व बहुराज्यिय पतसंस्थांमधील ठेवी परत मिळण्यासाठी संसदेमधे प्रश्न उपस्थित करुन या विषयाकडे सरकारचे लक्ष वेधले होते. सदर संस्थांविरोधात अनेक तक्रारी आल्यानंतर केंद्रीय निबंधकांनी महाराष्ट्र शासनाच्या निबंधकांना चौकशी करण्याचे आदेश दिले होते. चौकशी अहवाल समाधानकारक नसल्याने या संस्थांवर बहु-राज्य सहकारी संस्था अधिनियम २००२ अंतर्गत कलम ८६ नुसार विघटन आदेश देण्यात आले असून कलम ८९ नुसार लिक्विडेटर नेमण्यात आले आहे. नेमण्यात आलेले लिक्विडेटर हे संस्थांची चल/अचल मालमत्ता विक्री करून कलम ९० व नियम २० व २९ नुसार ठेवीदारांना पैसे परत करणार असल्याची माहिती देण्यात आली. सरकारने ठेवीदारांचा विश्वास पुनर्स्थापित करण्यासाठी २०२३ मध्ये बहु-राज्य सहकारी संस्था सुधारणा कायदा लागू केला आहे. यात सहकारी निवडणूक प्राधिकरण, लोकपाल नियुक्ती, पारदर्शक लेखापरीक्षण, नवीन गुंतवणूक मार्गदर्शक तत्वे, संचालक अपात्रता निकष व फसवणुकीवर कठोर कारवाई अशा अनेक तरतुदी करण्यात आल्या आहेत. त्यामुळे बीड जिल्ह्यासह इतर भागातील ठेवीदारांना संस्थांच्या मालमत्तेतून कायदेशीररित्या परतफेड मिळणार असून, सरकारने त्यांच्या हितासाठी ठोस उपाययोजना केली असल्याचे केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी उत्तरात म्हटले आहे.

## खा.सोनवणे राहिले ठेवीदारांची पाठीशी उभा

बीड जिल्ह्यासह मराठवाड्यात अनेक मल्टिस्टेटवाल्यांनी सामान्य ठेवीदारांना चुना लावलेला आहे. सदरील प्रकरणात ठेवीदारांनी खा.बजरंग सोनवणे यांची भेट घेवून आमचा प्रश्न संसदेत मांडा, आम्हाला न्याय द्या, असे म्हटले होते. खा.बजरंग सोनवणे यांनी ठेवीदारांचा विचार करून संसदेत प्रश्न उपस्थित केला होता. आज केंद्रीय मंत्री यांनी दिलेल्या उत्तरामुळे ठेवीदारांना मोठा दिलासा मिळाला असून ठेवीदारांनी खा.सोनवणे यांचे आभार मानले

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

गुरुवार २१ ऑगस्ट २०२५
https://lokaarambh.com



सं पा द की य

## हस्तकलेचे विद्यार्थी जीवनातील फायदे



सर्वोच्च न्यायालयाने दिल्ली-NCR मध्ये सर्व भटक्या कुत्र्यांना रस्त्यावरून डॉग शेल्टर होममध्ये पाठवण्याचे आदेश दिले. त्याविरोधात लोक रस्त्यावर उतरले. पण याचवेळी एक हृदयद्रावक घटना समोर आली आहे. कुत्रा चावल्याने वेळेवर इलाज न झाल्यास काय होते, याचे वृत्त तुम्ही वाचले अथवा पाहिले असतील. पण कुत्र्याने दोन वर्षांच्या बाळाच्या जखमेला चाटल्याने त्याचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या घटनेने एकच खळबळ उडाली आहे. अदनान नावाच्या 2 वर्षांच्या मुलाचा रेबीजमुळे मृत्यू ओढावला. या कुत्र्याने बाळाची एक जखम जिभेने चाटली होती. कुटुंबाने त्याकडे दुर्लक्ष केले. हा हलगर्जीपणा मुलाच्या जीवावर उठला. कुत्र्याने एक महिन्यापूर्वी मोहम्मद अदनान याच्या पायावर एक जखम झाली होती. ती कुत्र्याने चाटली होती. त्यानंतर हा मुलगा पाण्याला घाबरायला लागला आणि त्याने पाणी पिणेच बंद केल्याने कुटुंबाला संशय गेला. या लक्षणाला हायड्रोफोबिया म्हणतात. मुलाची तब्येत बिघडल्यावर त्याला सार्वजनिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले. तिथे दुसऱ्या दिवशीच हे मुल दगावले. या घटनेने कुटुंबालाच नाही तर त्या परिसराला मोठा धक्का बसला. या गावातील जवळपास दोन डझन लोकांना रुग्णालयात आणून त्यांना रेबीजचे इंजेक्शन देण्यात आले. त्यानंतर डॉक्टरांचं पथक या गावात पोहचले आणि त्यांनी रेबिजची कारणं, लक्षणं,परिणाम आणि उपायांची माहिती दिली. उत्तर प्रदेशातील बदायू जिल्ह्यातील गावात ही घटना घडली. त्यानंतर डॉक्टरांचे पथक गावात दाखल झाले. त्यांनी गावकऱ्यांना रेबिजची माहिती दिली. केवळ कुत्रा चावल्यानेच नाही तर कुत्रा चाटल्याने सुद्धा रेबीजचा धोका होऊ शकतो असा दावा त्यांनी केला. त्याकडे अजिबात दुर्लक्ष करू नका. या गोष्टींकडे कानाडोळा करू नका असा दावा त्यांनी केला. अशा प्रसंगात लागलीच रेबीजचे इंजेक्शन घ्यावे असा सल्ला डॉक्टरांनी दिला

### रेबीज काय आहे?

रेबीज एक असा आजार आहे, जो मेंदू आणि मज्जासंस्थेला प्रभावित करतो. हा आजार जीवाणूंमुळे होतो. त्याचे नाव रॅपटो व्हायरस असे आहे. कुत्रा चावला अथवा तो चाटला जरी तरी त्यामुळे हा आजार पसरतो. अशा आजारामुळे मृत्यू पण ओढावू शकतो. कुत्र्याच्या लाळेत रेबिज व्हायरस असू शकतो. हा व्हायरस जखम, मेम्ब्रेन (डोळे,तोंड,नाक) यांच्या संपर्कात आल्यावर मनुष्यात संक्रमित होऊ शकतो आणि त्यामुळे जीव जाऊ शकतो.

# धक्कादायक, यवतमाळ येथे रेल्वे पुलाच्या खड्ड्यात बुडून 4 मुलाचा मृत्यू

यवतमाळ जिल्ह्यातील दारव्हा शहरात वर्धा -नांदेड रेल्वे स्टेशन परिसरात बांधण्यात येणाऱ्या रेल्वे उड्डाण पुलासाठी खोदलेल्या खड्ड्यात चार मुले बुडाल्याची धक्कादायक घटना सायंकाळी घडल्याने खळबळ उडाली आहे. ही मुले तेथे नेमकी कशासाठी गेली होती हे कळलेले नाही. मात्र मुले बुडाल्यानंतर त्यांना स्थानिकांनी पाण्याबाहेर काढून रुग्णालयात नेले. तेथे तपासून त्यांना मृत घोषीत करण्यात आल्याने परिसरात शोककळा पसरली आहे.

यवतमाळ जिल्ह्यातील दारव्हा शहरात वर्धा-नांदेड स्थानक परिसरातील रेल्वे उड्डाण पुलासाठी खोदकाम करण्यात आले होते. त्याठिकाणी मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते. या पाण्यात पडल्याने चार मुलांना नाका तोंडात ते पाणी गेले. स्थानिकांनी या मुलांना कसे तरी बाहेर काढले. त्यानंतर त्यांना



प्रथमोपचार देण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र मुलांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना तातडीने यवतमाळ येथे हलविण्यात आले. या मुलांना रुग्णालयात दाखल केल्यानंतर डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. या मुलांची नावे रीहान असलम खान ( १३ ) गोलु पांडुरंग नारनवरे (१०) सोम्या सतीश खडसन (१०) वैभव आशीष बोधले (१४) अशी आहेत. ही सर्व मुले दारव्हा शहरात राहणारी असून या मोठ्या दुर्घटनेने परिसरात रेल्वे आणि प्रशासनाविरोधात रोष व्यक्त होत आहे. परिसरात तणाव आणि हळहळया घटनेची माहिती शहरात पसरताच रुग्णालय परिसरात नागरिकांची मोठी गर्दी केली. त्यामुळे येथे काही काळ तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. पोलिसांनी घटनास्थळी जाऊन तणाव निवळण्यासाठी प्रयत्न केला.या चारही मुलांवर प्राथमिक उपचार केल्यानंतर प्रकृतीत सुधारणा होत नसल्याने ऑक्सिजन लावून त्यांना यवतमाळला हलवण्यात आले होते. दोन रुग्णवाहिकेद्वारे या चारही मुलांचे मृतदेह यवतमाळ येथून दारव्हा येथील उपजिल्हा रुग्णालयात रात्री ९ वाजताच्या सुमारास आणण्यात आले.त्यावेळी नागरिकांनी रुग्णालय परिसरात मोठी गर्दी केली होती.

# देहव्यापाराचे रॅकेट उद्ध्वस्त, मुलींचे फोटो व्हॉट्सअपवर दाखवून डील व्हायची, नंतर भाड्याच्या रुममध्ये...

नागपूर शहरातील हुडकेश्वर परिसरातून एका बातमीने सगळ्यांना धक्का बसला आहे. क्राईम ब्रांचने ऑपरेशन शक्ती अंतर्गत एका मोठ्या शरीर विक्रय करणारे मोठी रॅकेट उद्ध्वस्त केले आहे. यात WhatsApp वर मुलींचे फोटो दाखवून ग्राहकांशी डील केली जात होती. नंतर भाड्या रुमवर हा वेश्या व्यवसाय बिनदिक्कतपणे सुरु होता. या प्रकरणात एका मायलेकाला अटक झाल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. काय आहे प्रकरण पाहूयात..हुडकेश्वर लेआऊटच्या एका रुमवर देह व्यापार सुरु असल्याची गुप्त माहीती पोलिसांना मिळाली होती. त्यानंतर पोलिसांनी खातरजमा करण्यासाठी नकली ग्राहक बनून ऑनलाईक संपर्क केला. त्यानंतर बोलणी होऊन सौदा पक्क झाला. एका युवतीला पाठवण्यासाठी एक हजार रुपये अडव्हान्स घेतले. ही रक्कम मिळताच आरोपीपर्यंत पोहचलेल्या पोलिसांनी घरावर छापा टाकला. यात आई आणि मुलाला अटक केली आहे. आई आणि मुलाला अटक

पोलिसांच्या चौकशी आरोपीचे नाव सुनीता विकास आणि यश कांबळे असे आहे. दोन्ही आरोपी सहा महिन्यांपासून हा रुम भाड्याने घेऊन येथे देहव्यापार चालवत होते. यासाठी आरटीओची खाजगी काम करण्याच्या नावाखाली हा रुम भाड्याने घेतला होता. परंतू येथे कुंटणखाना सुरु होता. या ठीकाणाहून एका २७ वर्षांच्या महिलेची सुटका करण्यात आली. ही तरुण छत्तीसगड येथील रहिवासी आहे. पैशांची लालूच दाखवून नागपुरला तिला आणण्यात आले होते. सुनीता आणि यश हे मायलेक हुशारीने काम करायचे. केवळ श्रीमंत आणि प्रीमीयम ग्राहकांना टार्गेट करायचे. आणि आता व्हॉट्सअपवर तरुणीचा फोटो पाठवायचा आणि नंतर ग्राहक पसंद असलेली मुलगी निवडायचा आणि नंतर अडव्हान्स रक्कम घ्यायचे. सौदा पक्का झाल्याने मुलीला ग्राहकाकडे पाठवले जायचे. छाप्या दरम्यान पोलिसांनी 94,700 रुपयांची सामुग्री जप्त केली आहे.ज्यात 63,500 रुपये रोख आणि 31,000 रुपयांचे चार मोबाईल फोनचा समावेश आहे.या ठिकाणी सुटका केलेल्या मुलीचे मेडीकल तपासणी केली. याआधी १४ ऑगस्ट रोजी ऑपरेशन शक्ती अंतर्गत सीताबर्डी परिसरातून हायप्रोफाईल सेक्स रॅकेट उद्ध्वस्त केले आहे. मंगलम अपार्टमेंटमध्ये ‘लुक बुक बाय इनारा यूनिसेक्स सलून’ च्या नावाखाली वेश्या व्यवसाय सुरु होता.

# पाली येथील चारा लागवडीची ॲड. निलेश हेलोंडे-पाटील यांच्याकडून पाहणी

बीड, दि.20 (जिमाका): दुष्काळी परिस्थितीमध्ये ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना विविध अडचणींचा सामना करावा लागत असून, पशुधनासाठी पुरेसा चारा उपलब्ध करून देण्यासाठी मिशनच्या माध्यमातून राबविण्यात येत असलेल्या पाली येथील चारा लागवडीच्या उपक्रमाला कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे पाटील यांनी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी करत समाधान व्यक्त केले.

यावेळी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी श्री. थोरात, गट विकास अधिकारी श्री. राठोड, ग्रामपंचायतीचे सरपंच यांच्यासह महसूल मंडळ अधिकारी पाली, श्रीमती चाटे, ग्राम महसुल अधिकारी अनिल गायकवाड, ग्रामसेवक शंकर वाघमारे तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे पाटील म्हणाले की, गायरान जमिनीवर चारा लागवड करुन, शेतकरी कुटूंबांना दुग्ध व्यवसायाच्या माध्यमातून शाश्वत अर्थिक उत्पन्नासाठी प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. अनेक कुटूंबाकडे चारा लागवडीसाठी स्वत:ची जमीन नसल्यामुळे शासनामार्फत गायरान जमिनीवर चारा लागवड करून त्यांना मदत करण्यात येत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा चाऱ्यासाठी होणाऱ्या खर्चाची बचत होणार आहे. पारंपरिक पद्धतींसोबतच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्यास कमी जागेतही भरपूर उत्पादन घेता येते. यामुळे चारा टंचाईवर मात करता येईल. तसेच पशुधनाचे पोषण व्यवस्थित होईल तसेच रोजगार निर्मिती, कार्बन क्रेडिट निर्माण, जमिनीची सुपीकता वाढविणे यासारखे अनेक फायदे होणार आहेत. तसेच पाऊस कमी पडल्यास या क्षेत्रास पाण्याची व्यवस्था करण्यात यावी, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

यावेळी ॲड हेलोंडे यांनी ग्रामस्थांशी संवाद साधुन त्यांच्या समस्या जाणुन घेत. मिशनतर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती देवून, शेतकऱ्यांनी त्या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहनही केले. त्यांनी विशेषतः सामुदायिक स्तरावर चारा लागवड, साठवणूक केंद्रांची उभारणी, जलसंधारणाच्या उपाययोजना व पाणी बचतीच्या आधुनिक तंत्रांचा अवलंब करण्याचे महत्व अधोरेखित केले. तसेच त्यांना चारा लागावडीकरीता प्रोत्साहित केले.

# गणेशोत्सव - ईद ए मिलाद सण एकात्मतेने जबाबदार नागरिक म्हणून साजरा करावे -जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

बीड, दि.20 : आगामी कालावधीत येणाऱ्या गणेशोत्सव आणि ईद ए मिलाद हे सण सर्व नागरिकांनी कायदा व सुव्यवस्था आणि सामाजिक शांतता सलोखा अबाधित ठेवत हे सण आनंदाने आणि शांततेत साजरे करावेत असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात आयोजित गणेशोत्सव शातंता समितीच्या बैठकीत जिल्हाधिकारी जॉन्सन बोलत होते. यावेळी बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपविभागीय अधिकारी कविता जाधव, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विलास जाधव, जिल्हा अधिक्षक कार्यालयातील अतिरिक्त पोलीस अधिक्षक सचिन पांडकर, तहसीलदार, मुख्याधिकारी, पोलीस निरीक्षक, तसेच आरोग्य,



अग्निशमन, वीज वितरण, पाणीपुरवठा, परिवहन व नगरपरिषद यासारख्या विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. तसेच जिल्ह्यातील विविध सार्वजनिक गणेश मंडळांचे पदाधिकारी व समाजातील मान्यवर नागरिकही या बैठकीस उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री जॉन्सन म्हणाले की, गणेशोत्सव हा सामाजिक एकोप्याचा आणि श्रद्धेचा सण आहे. प्रशासन आणि गणेश मंडळांनी परस्पर समन्वयाने उत्सव सुरळीत पार पाडावा. या पार्श्वभूमीवर उत्सव काळात शांतता, सौहार्द व कायदा-सुव्यवस्थेची योग्य अंमलबजावणी व्हावी. गणपती उत्सव आणि ईद ए मिलाद हे सण एकात्मतेने जबाबदार नागरिक म्हणून साजरा करावेत. यावर्षीचा गणेशोत्सव राज्य महोत्सव म्हणून साजरा होणार असून, उत्कृष्ट देखावे, पर्यावरणपूरक गणेश मुर्ती, निर्माल्य विसर्जन हे व्यवस्थित कचरा न होता करावेत. तसेच ध्वनी प्रदूषण, विजेची सुरक्षितता, स्वच्छता आणि वाहतुक व्यवस्था आदींचे योग्य नियोजन करावे.तसेच गणेशोत्सवाच्या उत्कृष्ट देखाव्यास पु.ल. देशपांडे अकादमी तर्फे प्रथम, द्वितीय आणि तृतीय पुरस्कार देण्यात येणार असून, बीड जिल्ह्यातील गणेश भक्तांनी उत्कृष्ट देखावे, स्वच्छता पाळून बक्षिस जिंकण्याचा प्रयत्न करावा. तसेच पोलीस अधीक्षक कार्यालयीन यंत्रणेने सुरक्षा व्यवस्था अधिक बळकट ठेवावी. संवेदनशील भागांमध्ये विशेष पोलीस बंदोबस्त ठेवून सीसीटीव्हीद्वारे देखरेख ठेवावी. वाहतूक शाखेने मिरवणुकांच्या मार्गावर विशेष लक्ष ठेवावे. नगरपरिषद व ग्रामपंचायत विभागांनी स्वच्छता ठेवावी. दिवाबत्ती आणि विसर्जन स्थळांवरील सुविधा वेळेत पूर्ण कराव्यात. तसेच आरोग्य विभागानेही वैद्यकीय पथके तैनात ठेवावीत. गणपती स्थापनेच्या दिवशीची आणि गणपती विसर्जनाच्या दिवशीची वाहने सुस्थितीत असल्याची तपासणी करुनच वापरण्यात यावीत. विजेच्या लोबंकळणाऱ्या तारा, विजेचे वाकलेले खांब हे सुस्थितीत करुन घ्यावेत. गणेश मुर्तीचे विसर्जन करण्यासाठी विहीरी अधिग्रहीत कराव्यात. तसेच विहीरीत पुरेसे पाणी आहे की नाही, हे पण तपासून पाहावे. गणेश मंडळानी ऑनलाईन परवाना घेवून गणपती स्थापन करावेत. ग्रामीण भागात तहसीलदार आणि गटविकास अधिकारी यांच्याकडे परवानगीसाठी रितसर अर्ज करावेत. डिजेचा आवाज व लाईटींगचा प्रकाशासाठी ठरवून दिलेल्या नियमाप्रमाणेच ठेवावा. जेणे करुन वृध्द आणि आजारी व्यक्ती, लाहन बालकांना त्रास होणार नाही. सर्व विभागांनी आपापल्या जबाबदाऱ्या योग्यप्रकारे पार पाडाव्यात आणि एकमेकांशी समन्वय ठेवत हे उत्सव शांततेत पार पाडावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी जॉनसन यांनी यावेळी केले यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी बैठकीपूर्वी शासन निर्णयानुसार गणपती उत्सव कसा साजरा करावा याची माहिती दिली. यावेळी बैठकीस विविध विभागातील अधिकारी, गणेश मंडळाचे पदाधिकारी, शांतता समिती सदस्य व इतर सदस्यांची उपस्थिती होती.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
गुरुवार २१ ऑगस्ट २०२५
https://lokaarambh.com



## संतांनी समाजप्रबोधनाचे शिवधनुष्य हाती घ्यावे



आजच्या महाराष्ट्राला आणि देशाला अनेक गंभीर समस्यांनी ग्रासले आहे, वाढती महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचार, महिलांवरील अत्याचार, अराजकता, गुंडगिरी, फसवणूक, मोबाईलच्या अतिवापरामुळे होणारे दुष्परिणाम, आत्महत्या, पिळवणूक, नैतिकतेचा ऱ्हास, आणि कायद्याचा धाक नसणे यामुळे समाजात चिंतेचे वातावरण आहे. या सर्व समस्यांमुळे नागरिक हवालदिल झाले आहेत, आणि त्यांना योग्य दिशा व मार्गदर्शनाची नितांत गरज आहे. या परिस्थितीत संत मंडळी एक महत्त्वाचा मार्गदर्शक म्हणून पुढे येऊ शकतात.

महाराष्ट्राला संतांची फार मोठी परंपरा लाभली आहे, आणि त्यांनी वेळोवेळी समाजाला योग्य दिशा दाखवली आहे. संतांच्या कार्याची प्रासंगिकता आजही तेवढीच आहे, कारण त्यांचे विचार आणि शिकवण कोणत्याही काळासाठी योग्य आहेत. आज समाजात नैतिक मूल्यांचा ऱ्हास होताना दिसतोय. स्वार्थ, लोभ आणि केवळ 'कष्ट न करता सहज मिळवण्याची' प्रवृत्ती वाढली आहे. संतांच्या कीर्तनातून आणि प्रवचनातून नैतिकतेचे धडे पुन्हा गिरवले जाऊ शकतात. प्रामाणिकपणा, कष्ट आणि कर्तव्यनिष्ठा या मूल्यांचे महत्त्व ते लोकांना पटवून देऊ शकतात.

मुलगा-मुलगी भेद, सासू-सुनेतील संघर्ष यांसारख्या पारंपरिक समस्या आजही समाजात आहेत. संतांनी नेहमीच समानता आणि बंधुत्वाचा संदेश दिला आहे. त्यांच्या शिकवणीतून हे भेद कमी होऊन समाजात सलोखा निर्माण होऊ शकतो.

मोबाईलच्या अतिवापरामुळे होणारे दुष्परिणाम, वाढती व्यसनाधीनता यांसारख्या समस्यांवर संत योग्य मार्गदर्शन करू शकतात. भक्ती मार्ग आणि अध्यात्मिक विचारांनी मन शांत आणि संयमी होते, ज्यामुळे चुकीच्या प्रवृत्तींपासून दूर राहण्यास मदत होते. नैसर्गिक आपत्ती आणि बिगरमोसमी पावसामुळे होणारे नुकसान, वाढती महागाई अशा संकटांमध्ये नागरिक निराश होऊन टोकाची पाऊले उचलतात. संतांचे विचार लोकांना धीर देतात आणि कोणत्याही संकटाला धैर्याने सामोरे जाण्याची प्रेरणा देतात.

विद्यार्थ्यांनी आणि सामान्य नागरिकांनी वाचनापासून दूर जाणे हे चिंतेचे कारण आहे. संत मंडळी शाळा-महाविद्यालयांमध्ये जाऊन तरुणाईला एकत्र करून त्यांना वास्तवाची जाणीव, कर्तव्ये, हक्क आणि जबाबदाऱ्या याविषयी प्रबोधन करू शकतात. यामुळे नागरिक अधिक जागरूक आणि जबाबदार बनतील.

संतांनी शिवधनुष्य कसे उचलावे? :- संतांनी हे शिवधनुष्य उचलण्यासाठी विविध मार्ग अवलंबता येतील.

कीर्तने आणि प्रवचने:- ही संतांच्या प्रबोधनाची मुख्य साधने आहेत. यातून ते सध्याच्या समस्यांवर भाष्य करून त्यावर आध्यात्मिक आणि नैतिक उपाय देऊ शकतात.

शाळा-महाविद्यालयांमध्ये मार्गदर्शन:- तरुणाईला योग्य दिशा देण्यासाठी संतांनी विशेष करून शिक्षण संस्थांमध्ये जाऊन त्यांच्याशी संवाद साधणे आवश्यक आहे.

गावोगावी संपर्क:- शहरांबरोबरच ग्रामीण भागातील नागरिकांपर्यंत पोहोचून त्यांनाही प्रबोधनाच्या माध्यमातून मार्गदर्शन करणे महत्त्वाचे आहे.

साहित्य आणि प्रसारमाध्यमांचा वापर: संतांचे विचार आणि शिकवण पुस्तके, मासिके, आणि आता सोशल मीडियासारख्या माध्यमांद्वारे अधिक लोकांपर्यंत पोहोचवता येऊ शकते.

अपेक्षा आणि आव्हान :- हे कार्य निश्चितच सोपे नाही आणि यासाठी वेळ लागेल. राजकीय पक्षांनी किंवा व्यक्तींनी यामध्ये राजकारण न आणता संतांना पाठिंबा देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण, संतांचे कार्य हे समाज हिताचे असून ते कोणत्याही राजकीय हेतूने प्रेरित नसते.

एकूणच, समाजात सध्या जी अस्वस्थता आणि निराशा आहे, त्यावर मात करण्यासाठी संतांचे प्रबोधन हे एक प्रभावी आणि आवश्यक पाऊल आहे. त्यांच्या मार्गदर्शनाने समाजाला पुन्हा एकदा नैतिकतेचे, शांतीचे आणि प्रगतीचे नवे पर्व दिसू शकते.


**राजेंद्र चौधरी**
**रोझोदा. ता. रावेर. जि. जळगाव**
**मो. ७७००९८२७६५**

## प्रसिद्ध उद्योगपती शिवशताक्षी मसाल्याचे मॅनेजिंग डायरेक्टर शितलशेठ चिवटे यांची कडा येथे सदिच्छा भेट



कडा (प्रतिनिधी) येथे कुरडवाडी येथील प्रसिद्ध उद्योगपती शिवशताक्षी मसाल्याचे मॅनेजिंग डायरेक्टर शितल शेठ चिवटे यांनी सदिच्छा भेट दिली यावेळी सर्व व्यापाऱ्यांकडून त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी जैन श्रवक संघ कडाचे अध्यक्ष रतिलाल जी कटारिया. सामाजिक कार्यकर्ते तथा कडा शहराचे माजी सरपंच अनिल तात्या ढोबळे. व्यापारी संघटनेचे सचिव नितीन शेठ शिंगवी, प्रकाशशेठ श्रीश्रीमाळ, रामशेठ ससाने, अमित शेठ राठोड, सचिन शेठ गांधी,सागरशेठ श्रीश्रीमाळ,संदीप शेठ चानोदीया, वसंत शेठ चोरबेले, गणेशशेठ कटारीया,आयुब मोमीन, नासिर पानसरे,निहाल शिंगवी,विनित शिंगवी,व शिवशतक्षी मसाल्याचे कंपनीचे प्रतिनिधी आर एस एम योगेश कुंभार सर व एक एस एम लींगेश्वर तकटे सर उपस्थित होते. यावेळी उद्योगपती शितल शेठ यांनी सांगितले की खूप कमी दिवसात आमचे कष्ट व व्यापाऱ्यांची व ग्राहकांची साथ या जोरावर बाजारपेठेत आम्ही यशाचे शिखर सर करत आहोत.तसेच त्यांनी सर्व व्यापाऱ्यांना कुरूडवाडी येथे कंपनी व्हिजीट साठी येण्याचे निमंत्रण दिले.तर सर्व व्यापाऱ्यांकडून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. यानंतर त्यांनी कडा येथील व्यापारी संघटनेचे अध्यक्ष नागेश तात्या कर्डिले यांच्या शिवनेरी पतसंस्था येथे भेट दिली. पतसंस्थेकडून त्यांचा व्यापारी संघटनेचे माजी अध्यक्ष नवनाथ दादा कर्डिले यांच्याकडून सत्कार करण्यात आला यावेळी पतसंस्थेचे अमोल कर्डिले व प्रशांत गिलचे उपस्थित होते.

## विरोधकांनी आपत्तीचे राजकारण करणे दुर्दैवी
### उपमुख्यमंत्री अजित पवार मुंबईच्या सेवेत – प्रवक्ते भागवत तावरे



मुंबई प्रतिनिधी गेली चार दिवस मुंबईसह राज्यभर संततधार पाऊस सुरु असल्याने अनेक ठिकाणी रहदारीस अडथळा निर्माण झालेला असून अनेक भागात शेती पिकांचे नुकसान झालेले आहे.शासन सर्व स्तरावर प्रयत्न करत असताना विरोधी पक्षाचे नेते मंडळी मात्र यावरून राजकारण आणि निवडणुकांची तयारी करत असल्याचे सांगत सदरील प्रकार दुर्दैवी असल्याचे राष्ट्रवादी पक्षाचे प्रवक्ते भागवत तावरे यांनी म्हटले आहे.त्यांनी मुलुंड येथील सभेतील शशिकांत शिंदे यांच्या वक्तव्याला उत्तर दिले . राज्यभर सुरु असलेल्या पावसाने जनजीवन विस्कळीत झालेले असताना सरकार सर्व स्तरावर मदत करत आहे अश्या वेळी महाराष्ट्र धर्म जागवणे अपेक्षित असताना विरोधक मात्र मुंबई तुंबली म्हणून ती जिंकण्याचे स्वप्न पावसात पाहत आहेत . दुःखावर भाकरी भाजण्याचे स्वप्न पाहणाऱ्या विरोधक मित्रांनी राजकीय भाष्य करू नये असे नाही मात्र वेदनेचा बाजार करणे संवेदनशीलतेचे लक्षण नाही . मुलुंड येथील सभेत शरद पवार पक्षाचे प्रदेश अध्यक्ष शिशिकांत शिंदे यांनी मुंबई पाण्यात असून गेली पाच वर्षे इथे सरकारने काहीही केले नसल्याचे सांगत येणाऱ्या निवडणुकात मते देण्याचं आवाहन केले . तसे पाहता शिंदे यांनी त्याच पाच वर्षात काही वर्षे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे होते त्या काळात पाऊस रजेवर नव्हता आणि मुंबई देखील तुंबली होती . दूरगामी समस्यांचे निराकरण दूरगामी प्रयत्नातून होणार असते . आज राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार साहेब परिस्थितीवर बारीक लक्ष ठेऊन असून शेवटच्या घटकापर्यंत सुविधा दिलासा देण्याचा तो प्रयत्न करत आहेत . शासन आणि प्रशासन मदत करत असताना विरोधकांकडून आपत्तीचे राजकारण होणे दुर्दैवी असल्याचे राष्ट्रवादीचे प्रवक्ते भागवत तावरे यांनी म्हटले आहे

## यशवंतराव चव्हाण पंचायत राज अभियानांतर्गत गुणवंतांचा गौरव




छत्रपती संभाजीनगर, दि.20 :"प्रामाणिकपणे, जबाबदारीने आणि कार्यतत्परतेने काम करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा गौरव हा इतरांसाठी प्रेरणादायी ठरतो," असे प्रतिपादन विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी केले. यशवंतराव चव्हाण पंचायत राज अभियानांतर्गत गुणवंत अधिकारी-कर्मचारी तसेच आदर्श ग्रामविकास अधिकारी व ग्रामसेवकांचा सन्मान सोहळा विभागीय आयुक्त कार्यालयात पार पडला. या कार्यक्रमात विभागीय आयुक्त पापळकर यांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात आले. कार्यक्रमाला आस्थापना विभागाचे अपर आयुक्त राजेंद्र अहिरे, गटविकास अधिकारी राजेंद्र महाजन, कक्ष अधिकारी मिलिंद म्हस्के, दिलीप भूमरे, अनिल टेकाळे, श्रीमती सुवर्णा शिंदे यांच्यासह अधिकारी-कर्मचारी व पुरस्कार विजेत्यांचे नातेवाईक उपस्थित होते. गुणवंत अधिकारी-कर्मचारी सन्मानित मिलिंद पाराजीराव तुरूकमारे – विस्तार अधिकारी, जिल्हा परिषद बीड सुनील शिवाजीराव नवले – सहायक प्रशासन अधिकारी, जिल्हा परिषद बीड मनोजकुमार मोहनराव येरोळे – सहायक लेखाधिकारी, जिल्हा परिषद लातूर मण्मथ धोंडिबा मुक्तापुरे – कृषी अधिकारी, जिल्हा परिषद लातूर सचिन वैजनाथ काडवादे – कनिष्ठ प्रशासन अधिकारी, जिल्हा परिषद लातूर आदर्श ग्रामविकास अधिकारी व ग्रामसेवक सन्मानित श्रीमती शितल त्र्यंबकराव उमप – ग्रामसेवक, पोखरी (संभाजीनगर) नंदकिशोर विनायकराव वानखेडे – ग्रामविकास अधिकारी, जालना सुखदेव देवसिंग शेळके – ग्रामविकास अधिकारी, जालना मधुकर मानसिंग मोरे – ग्रामसेवक, नांदेड कु. पुष्पा बालासाहेब काळे – ग्रामसेवक, परभणी विजयसिंह विलासराव नलावडे – ग्रामविकास अधिकारी, धाराशिव धनंजय रामराव भोसले – ग्रामसेवक, लातूर गोपीनाथ भीमराव इंगोले – ग्रामसेवक, हिंगोली

## पायाभूत विकास प्रकल्पांसाठी युनिक आयडी पोर्टल प्रशिक्षण कार्यशाळा



छत्रपती संभाजीनगर, दि.20 :- राज्यातील प्रत्येक पायाभूत प्रकल्पासाठी युनिक पायाभूत सुविधा आयडी (Infra ID Portal) संदर्भात प्रशिक्षण कार्यशाळेचे उद्घाटन विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांच्या हस्ते जिल्हा नियोजन समिती सभागृहात करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, नियोजन विभागाचे उपायुक्त विजय पवार, जिल्हा नियोजन अधिकारी भारत वायाळ यांच्यासह विभागातील सर्व जिल्ह्यांचे नियोजन अधिकारी उपस्थित होते. विभागीय आयुक्त श्री. पापळकर म्हणाले, "युनिक पायाभूत सुविधा आयडी पोर्टल ही नवी संकल्पना असून या तंत्रज्ञानाचा वापर करून विकासकामांची सुसूत्रता, समतोल विकास व खर्चबचत साधता येणार आहे." राज्यात १ ऑक्टोबर २०२५ पासून प्रत्येक पायाभूत प्रकल्पासाठी युनिक आयडी अनिवार्य असणार आहे. प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मान्यता, देयके, तसेच मंजुरीपासून अंमलबजावणी व देखभालपर्यंत सर्व माहिती या आयडीद्वारे ट्रॅक केली जाणार आहे. प्रशिक्षणात नव्या सुविधेची नोंद पोर्टलवर कशी करायची, मॅपिंग पद्धती, कामांचे स्वरूप व निकषांनुसार नोंदणी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजना केंद्र, नागपूरचे श्री. अभिजित व श्री. स्वराज यांनी प्रात्यक्षिक सादरीकरण केले. प्रास्ताविक उपायुक्त (नियोजन) विजय पवार यांनी केले. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी मार्गदर्शन केले. तसेच श्री. संजय पाटील, विभाग प्रमुख (मुंबई व पुणे), महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजना केंद्र यांनी पोर्टलच्या वापराबाबत मार्गदर्शन केले. या प्रशिक्षण कार्यशाळेत छत्रपती संभाजीनगर विभागातील सर्व जिल्हा नियोजन अधिकारी व प्रमुख यंत्रणांचे अधिकारी सहभागी झाले.

# डॉ.बाळकृष्ण रामचंद्र लळीत सिंधुदुर्ग भूषण पुरस्काराने सन्मानित




जयेश अ.माधव(पुणे) :सिंधुदुर्ग जिल्हा उत्कर्ष मंडळ पिंपरी चिंचवड पुणे यांच्या तर्फे 'सिंधुदुर्ग भूषण' हा मानाचा पुरस्कार मालवणी भाषा अभ्यासक आणि लेखक डॉ.बाळकृष्ण रामचंद्र लळीत यांना १५ ऑगस्ट रोजी अकुर्डी येथे झालेल्या वार्षिक स्नेहसंमेलनात क्रिकेटपटू व प्रशिक्षक पांडुरंग साळगांवकर तसेच मंडळाचे अध्यक्ष श्री अजय पाताडे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. डॉ.बाळकृष्ण लळीत यांनी अध्यापन करता करता प्रचंड लेखन केले आहे. त्यांची जवळपास २२ पुस्तके प्रकाशित आहेत.त्यांनी अनेक चर्चासत्रे गाजवली आहेत.अनेक नियतकालिकातून त्यांचे लेखन प्रकाशित झाले आहे.७ मालवणी बोलीभाषा संमेलने त्यांच्या नावावर आहेत.अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांनी ते सन्मानित आहेत.अनेक साहित्य संमेलानांचे ते आयोजक सुद्धा राहिले आहेत. लळीत सरांनी दक्षिण कोकणच्या अध्यात्मिक रहस्याच्या शोधात हि सिरीज लिहून कोकणातील असंख्य देवी, देवता, सिमधडे यांची संशोधनात्म माहिती सर्वांसमोर ठेवली आणि अनेकांना पुन्हा गावाकडे बघण्याचा नवा दृष्टिकोन दिला. सिंधुदुर्ग जिल्हा हा अगदी ब्रिटिश काळापासून संगीत,शिक्षण, कला यामध्ये आघाडीवर होता. अनेक कलाकार,नट, शिक्षण क्षेत्रातील नामवंत, संगीत क्षेत्रातील नामवंत या भागात होऊन गेले पण आजच्या काळात त्यांची नावे मात्र लुप्त झाली होती. त्यांनी केलेली साधना त्यांच्या बरोबर संपली होती आणि त्यांची नावेही काळाच्या पडद्याआड झाली होती. अशा वेळी लळीत सरांमधील संशोधक शांत रहाणे शक्यच नव्हते. त्यांनी अनेक माध्यमातून,प्रत्यक्ष त्यांच्या नातेवाईकांना, हितचिंतकांना भेटून माहिती जमा केली आणि हि अनमोल माहिती त्यांनी सिंधुरत्ने या पुस्तक रूपात जगासमोर मांडली.सध्या जरी सिंधुरत्ने चे दोन खंड उपलब्ध असले तरी भविष्यात किमान आठ ते दहा खंड वाचकांना उपलब्ध होतील. सिंधुरत्ने हा डॉ.लळीत यांच्या आयुष्यातील मैलाचा दगड ठरणार आहे. सिंधुदुर्ग भूषण हा मानाचा पुरस्कार मिळाल्यामुळे डॉ. बाळकृष्ण लळीत यांचे सिंधुदुर्ग आणि महाराष्ट्रातील सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर



# आदेश आलाच! पोलीस भरतीला हिरवा कंदील, कोणत्या पोस्टसाठी किती जागा?

गेल्या अनेक दिवसांपासून राज्यात पोलीस भरती व्हावी अशी मागणी केली जात होती. राज्यभरात हजारो तरुण पोलीस दलात सामील होण्यासाठी पूर्ण तकदीने अभ्यास करत आहेत. दरम्यान, राज्य सरकारने नुकतेच राज्यात एकूण 15 हजार पदांसाठी पोलीस भरती होणार असल्याचे जाहीर केले होते. या पदांसाठी भरती प्रक्रिया नेमकी कधी राबवली जाणार, असे तरुणांकडून विचारले जात होते. असे असतानाच आता सरकारने या भरतीबाबतचा शासन निर्णय जारी केला आहे. या निर्णयानंतर आता पोलीस शिपाई तसेच कारागृह शिपाई पदाच्या भरतीचा मार्ग मोकळा झाला असल्याचे बोलले जात असून तरुणांनीही तयारीला लागावे, असे आवाहन केले जात आहे. या निर्णयामुळे आता हजारो तरुणांचे सरकारी नोकर होण्याचे स्वप्न पूर्ण होणार आहे. सरकारने नेमका काय निर्णय जारी केलाय?मिळालेल्या माहितीनुसार राज्य सरकारने नुकतेच पोलीस दलातील 15 हजार 631 पदभरतीचा शासन निर्णय जारी केला आहे. पोलीसदलातील पदं शंभर टक्के भरण्यात येणार आहेत. या निर्णयाअंतर्गत आता जानेवारी 2024





पासूनची रिक्त पदं भरली जाणार आहेत. कोणकोणत्या पदांसाठी भरती होणार?

जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार आता पोलीस शिपाई पदासाठी 12 हजार 399 जागांची भरती होणार आहे. तर पोलीस शिपाई चालक पदाच्या एकूण 234 जागा भरल्या जाणार आहेत. बॅण्ड्समन पदाच्या एकूण 25 जागा भरल्या जाणार आहेत. तर सशस्त्र पोलीस शिपाई पदाच्या एकूण 2 हजार 393 जागांसाठी ही भरती प्रक्रिया राबवली जाणार आहे. कारागृह शिपाई पदाच्या एकूण 580 जागांसाठी भरती प्रक्रिया राबवली जाणार आहे.ऑगस्ट महिन्यात घेण्यात आला निर्णयदरम्यान, याआधी 12 ऑगस्ट रोजी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत पोलीस भरतीला मान्यता देण्यात आली होती. या मान्यतेनंतर पुढील शासकीय प्रक्रियेला सुरुवात झाली होती. याच प्रक्रियेअंतर्गत आता पोलीस भरती करण्याचा आदेश निघाला आहे. लवकरच पोलीस भरतीसंदर्भातील वेळापत्रक जाहीर केले जाणार असून तरुणांनी नोटिफीकेशनकडे लक्ष ठेवावे. तसेच तरुणांनी भरती प्रक्रियेसाठी आवश्यक असणाऱ्या सर्व कागदपत्रांची व्यवस्था अगोदरच करून ठेवावी असे आवाहन करण्यात आले आहे.

# उत्तम सदाकाळ यांच्या चातक कथेस राज्यस्तरीय पुरस्कार

पुणे (प्रतिनिधी) : साहित्य संवेदना प्रस्तुत कथास्तु राज्यस्तरीय कथा स्पर्धेत उत्तम सदाकाळ यांच्या चातक या प्रेमकथेस उत्कृष्ट कथेचा पुरस्कार जाहीर झाला आहे.या स्पर्धेत एकूण ४०० कथा आल्या होत्या त्यापैकी ८ उत्कृष्ट कथांची निवड करण्यात आली. रोख रक्कम व सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरुप आहे. पुरस्कार वितरण सोहळा प्रसिध्द कादंबरीकार शिवाजी सावंत यांच्या जन्मदिनी म्हणजे ३१ ऑगस्ट २०२५ रोजी त्यांच्या जन्म गावी आजरा येथे होणार आहे.



उत्तम सदाकाळ यांच्या चातक कथेत वाचकांना शेवटपर्यंत खिळवून ठेवण्याची ताकद असून या कथेचा धक्कादायक शेवट वाचकांना मनोमन हेलावून टाकतो.

उत्तम सदाकाळ यांनी आतापर्यंत ८९ पुस्तके लिहिलेली असून त्यांच्या अनेक सामाजिक कथांना,विनोदी कथांना, भयकथांना, बालकथांना यापूर्वी राज्यस्तरीय पुरस्कार मिळाले आहेत.तसेच त्यांच्या कथासंग्रहांना, कवितासंग्रहांना अनेक नामांकित साहित्य संस्थाचे पुरस्कार मिळाले आहेत. इयत्ता दुसरीच्या अभ्यासक्रमात उत्तम सदाकाळ यांची ‘पाऊस’ हि कविता समाविष्ट केलेली असून इयत्ता चौथी व पाचवीच्या वर्गासाठी समग्र शिक्षा ग्रंथालय उपक्रमांतर्गत “कमाई” या बालकथासंग्रहाची निवड झाली आहे.

आतापर्यंत ३३ पुरस्कारांनी सन्मानीत झालेल्या उत्तम सदाकाळ यांच्या पुरस्कार यादीत हा ३४ वा पुरस्कार समाविष्ट झाला आहे.

# राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलल्या

राज्याच्या राजकारणातून महत्वाची बातमी समोर आली आहे. राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या आहेत. राज्यात सर्वत्र सध्या मुसळधार पावसाचा कहर पहायला मिळत आहे. त्यामुळे सहकारी संस्थांच्या निवडणुका पुढे ठकलण्याचा निर्णय राज्य सहकारी निवडणूक प्राधिकारणानं घेतला आहे. याबाबत एक परिपत्रकही जारी करण्यात आलं आहे. आता या निवडणुका कधी होणार याबाबत माहिती जाणून घेऊयात.राज्य सरकारकडून निवेदन जारीराज्यात मुसळधार पाऊस पडत असल्याने निवडणुका पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबत राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणानं एक निवेदन प्रसिद्ध केले आहे. यात निवडणूक प्राधिकरणाने म्हटले की, ‘राज्यातील अनेक जिल्ह्यांतील पावसाची सद्यस्थिती विचारात घेऊनं ज्या सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रियेतील चिन्ह वाटपाचा टप्पा पूर्ण झाला आहे अशा संस्था, निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पहिली पदाधिकारी निवडणूक प्रक्रिया प्रलंबित आहे अशा संस्था, तसेच ज्या प्रकरणी संस्थेची निवडणूक घेण्याबाबत मा. उच्च न्यायालय/मा. खर्वोच्च न्यायालयाने आदेश दिले आहेत अशा संस्था वगळून महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम 2014 मधील नियम 4 मध्ये नमुद केलेल्या ‘अ’ व ‘ब’ वर्गातील सहकारी संस्थांची निवडणूक 30 सप्टेंबर, 2025 पर्यंत पुढे ढकलण्यात येत आहे.

## ...तर आम्हाला नथुराम गोडसे व्हावं लागेल, कीर्तनकार भंडारेंची बाळासाहेब थोरातांना थेट धमकी!

कीर्तनकर संग्रामबापू भंडारे यांनी काँग्रेसचे नेते तथा माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांना थेट धमकी दिली आहे. आम्हाला नथुराम गोडसे व्हावे लागेल, असं भंडारे यांनी म्हटलंय. संगनेर तालुक्यातील घुलेवाडी या गावात संग्रामबापू भंडारे यांच्या कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कीर्तनामध्ये भंडारी यांनी बाळासाहेब थोरात यांच्याविरोधात आक्षेपार्ह विधान केल्याचा थोरात समर्थकांचा दावा आहे. तर बाळासाहेब थोरात यांच्या समर्थकांनी आमच्यावर विनाकारण हल्ला केला, असं भंडारे यांचं म्हणणं आहे. त्यामुळे आता भंडारे यांनी गोडसेचे नाव घेत थोरातांना दिलेल्या धमकीची सगळीकडे चर्चा होत आहे. नेमकं काय घडलं?मिळालेल्या माहितीनुसार थोरात यांचा मतदारसंघ असलेल्या संगमनेरमध्ये संग्रामबापू भंडारे यांचे कीर्तन आयोजित करण्यात आले होते. कीर्तन चालू असताना त्यांनी बाळासाहेब थोरात यांच्याविषयी आक्षेपार्ह विधान केले होते, असे मत थोरात यांच्या समर्थकांचे आहे. त्यानंतर थोरात यांचे कार्यकर्ते चांगलेच आक्रमक झाले होते.

## खडक पाडा व्यापारी रहिवासी संघटना कल्याण तर्फे माजी सैनिक व ज्येष्ठ नागरिकांन सोबत 79 वा स्वातंत्र्यता दिन जल्लोषात साजरा

कल्याण:(सुनिल इंगळे) 15 ऑगस्ट 1947 हा दिवस भारतीय जनतेच्या बलिदानाचे, संघर्षाचे व स्वाभिमानाचे प्रतीक आहे. त्या दिवशी आपल्या देशाने गुलामगिरीच्या अंधकारातून स्वातंत्र्याच्या प्रकाशाकडे नवीन पाऊल टाकले आणि त्यासाठी ज्या जवानांच्या, देशप्रेमींच्या त्यागाने हा दिवस आपण अनुभवत आहोत त्यांचे आपल्यावर अगणित ऋण आहेत आणि म्हणून आज माजी सैनिकांचा व ज्येष्ठ नागरिकांच्या सन्मानाचे आगळे वेगळे आयोजन केल्याबद्दल आदरणीय मा. नगरसेवक उमेश




बोरगावकर यांचे विशेष कौतुक होत आहे. यावेळी प्रमुख पाहुणे एनडीआरएफ चे सब इन्स्पेक्टर विश्वद दूदया सोबत निवृत्त इंडियन नेव्ही कमांडर तीमोती बनझे, लाडा फाउंडेशनच्या श्रीमती फेल्सी फर्नांडिस, अभिनेत्री माधवी छाइलकर, निवृत्त इंडियन नेव्ही ऑफिसर सुरेश सांगळे, निवृत्त सोल्जर सुरेश शिंदे यांच्या हस्ते ध्वजारोहण करून मानवंदना देण्यात आली. याप्रसंगी या कार्यक्रमात विविध बाळ गोपाळांनी सहभाग घेऊन आपले देशभक्तीपर बोबडे बोल व्यक्त केले आणि कौतुकास प्राप्त ठरले. यावेळी प्रभागातील व परिसरातील माजी सैनिक व ज्येष्ठ नागरिक यांचा शाल आणि श्रीफळ प्रदान करून यथोचित सन्मान करण्यात आला.

तसेच एनडीआरएफ च्या वतीने उपस्थित सर्वांना उत्तम प्रकारे युद्धजन्य परिस्थितीत व पूरग्रस्त परिस्थितीत कोणकोणत्या उपाययोजना कराव्या लागतात आणि आपण ते घरोघरी त्याचे सोपे सोपे उपाय करू शकतात याचे प्रात्यक्षिक सादर करून अनमोल माहिती दिली.

श्री विनोद शेलकर यांनी उत्कृष्टपणे सूत्रसंचालन करून सहकार्य केले.सरते शेवटी अल्पोहारानंतर आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्या वतीने “चौथे राज्यस्तरीय राजकुमार काळभोर स्मृती साहित्य संमेलन 2025” यशस्वीरीत्या संपन्न

पुणे (दि. 19 ऑगस्ट 2025) – अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद, पुणे यांच्यातर्फे आयोजित ४ थे राज्यस्तरीय “राजकुमार काळभोर स्मृती साहित्य संमेलन” महात्मा फुले सांस्कृतिक भवन, वानवडी पुणे येथे मंगलमय वातावरणात संपन्न झाले. साहित्य, समाजकारण आणि सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत झालेल्या या संमेलनात विविध विषयांवर विचारमंथन झाले. या संमेलनाचे अध्यक्षपद ज्येष्ठ साहित्यिक कवी मा.श्री. सूर्यकांत नामुगडे यांनी, तर स्वागताध्यक्षपद मा. महाराष्ट्र केसरी श्री. राहुलभाऊ काळभोर यांनी भूषविले. उद्घाटक म्हणून सुप्रसिद्ध साहित्यिक मा.श्री. किशोर टिळेकर तर निमंत्रक म्हणून इतिहासकार मा.श्री. शरदजी गोरे होते. मा. श्रीमती शुभांगीताई काळभोर यांनी विशेष अतिथी म्हणून पदभूषविले. या संमेलनात कवीसंमेलनाध्यक्ष कोकण प्रदेश उपाध्यक्षा व समाजसेविका डॉ. अलका नाईक यांनी स्वर्गीय राजकुमार काळभोर यांना काव्यसुमनांनी आदरांजली अर्पण केली. अवयवदान




करा नवजीवन द्या असा संदेश व अवयवदानपत्रे त्यांनी सर्वांना दिली.

समर्पण या डॉ. अलका नाईक यांच्या अवयवदानावर आधारित कथासंग्रहाला विशेष सन्मान प्रदान करण्यात आला. सामाजिक जाणिवा जागृत करणाऱ्या या साहित्यकृतीस तसेच त्यांनी गाऊन सादर केलेल्या माझी माय या भावपूर्ण स्वरचित कवितेला उपस्थित रसिकांनी तसेच मान्यवरांनी मनःपूर्वक दाद दिली. संमेलनात देशभरातील कवी, कथाकार, साहित्यिक यांची उपस्थिती लाभली. नवनिर्वाचित महाराष्ट्र राज्य सरचिटणीस श्री. समीर गुधाटे तसेच अनेक नवोदित सभासदांचा यथोचित सन्मान करण्यात आला. विविध सत्रांमध्ये नवीन लेखन व प्रबोधनपर साहित्य यावर उत्तम चर्चासत्रे झाली. कवी संमेलनाचे विशेष अतिथी कवी श्री. सुभाष सोनवणे (निवृत्त पोलीस अधिकारी) यांनी कविता आणि तिचे सादरीकरण कसे असावे याचे सुंदर उदाहरण कविता सादर करून दिले. परिषदेचे अध्यक्ष श्री. शरद गोरे यांनी ‘कवींची/ साहित्यिकांची जबाबदारी’ यावर अतिशय सुंदर मार्मिक उद्बोधन केले. परिषदेचे अध्यक्ष सन्मा. डॉ. शरदजी गोरे यांच्या व उपाध्यक्षा सन्मा.श्रीमती शुभांगीताई काळभोर यांच्या संकल्पनेतून आणि संपूर्ण टीमच्या- श्री.अमोल कुंभार आणि सहकारी यांच्या प्रयत्नातून हे संमेलन मुसळधार कोसळणाऱ्या पावसातही यशस्वी झाले. संमेलनाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल परिषदेवर सर्व सामाजिक तसेच साहित्यवर्तुळातून शुभेच्छांचा अखंड वर्षाव होत आहे व कार्यक्षेत्राची नवी दालनेही प्राप्त होत आहेत.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com